# भूगोल

## उत्तरे : सराव प्रश्नपत्रिका 2 री

**प्र. 1.**

(1) कर्नाटक – महाराष्ट्र – बुंदेलखंड

(2) सावो पावलो, ॲमेझोनास, माटो ग्रासो

(3) मुंबई, गोवा, कांडला

(4) रिओ ग्रांडे, कुइयाबा, पोर्टो अलगर.

**प्र. 2.**

(1) (i) ब्राझीलमधील अजस्र कड्याद्वारे व्यापारी वारे अडवले जातात.
(ii) ब्राझील अजस्र कड्याच्या पलीकडे व्यापारी वाऱ्यांचा प्रभाव कमी होतो.
(iii) ब्राझीलमधील ईशान्य भागात कमी पाऊस पडतो.

(2) (i) क्षेत्राची निवड
(ii) क्षेत्रभेटीची पूर्वतयारी
(iii) क्षेत्रभेटीच्या ठिकाणाला भेट.

(3) (i) गंगा नदीच्या खोऱ्याचा प्रदेश सुपीक आहे.
(ii) गंगा नदीच्या खोऱ्यात शेती व इतर उद्योग विकसित झाले आहेत.
(iii) गंगा नदीच्या खोऱ्यात लोकसंख्या दाट आहे.

(4) (i) ब्राझीलमधील दक्षिण व आग्नेय भागात नागरीकरणाचा वेग जास्त असल्यामुळे तेथे लोकसंख्येचे केंद्रीकरण झाले आहे.
(ii) ब्राझीलमधील पश्चिम भागात नागरीकरणाचे प्रमाण तुलनेने कमी आहे.
(iii) ब्राझीलमधील विशिष्ट भागांत होणारे लोकसंख्येचे केंद्रीकरण टाळणे आवश्यक आहे.

**प्र. 3.**

**(1)** क्षेत्रभेटीचा अहवाल पुढील मुद्द्यांच्या आधारे तयार करू :
(१) प्रस्तावना.
(२) क्षेत्रभेटीचे महत्त्व व उद्दिष्टे.
(३) संबंधित क्षेत्रातील प्राकृतिक रचना, नद्या, तलाव, हवामान, पर्जन्यमान, उद्योग, पिके, प्राणी, वनस्पती, घरे व घरांची रचना, वाहतुकीच्या सोयी, लोकसंख्या, लोकांचा आहार, पोशाख, संस्कृती इत्यादी बाबींविषयीच्या माहितीचे संकलन व माहितीचे चित्रांच्या, छायाचित्रांच्या, तक्त्यांच्या, आलेखांच्या साहाय्याने सादरीकरण.
(४) निष्कर्ष, आभार प्रदर्शन व संदर्भसूची.

**(2)** (१) माहिती तंत्रज्ञान आणि संदेशवहनाच्या युगात संगणक, भ्रमणध्वनी, इंटरनेट, कृत्रिम उपग्रह इत्यादी इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या आधारे संदेशवहन केले जाते.
(२) आधुनिक संदेशवहन हे तुलनेने कमी खर्चीक व अधिक परिणामकारक असते.
(३) भारतात दूरसंचार उद्योग हे अतिवेगाने वाढणारे क्षेत्र आहे. भारत हा सर्वाधिक स्मार्टफोन आणि इंटरनेट वापरणाऱ्यांचा देश म्हणून ओळखला जातो.

(४) स्वदेशी तंत्रज्ञानाच्या आधारे तयार केलेले उपग्रह व उपग्रह प्रक्षेपण तंत्र यांच्या वापरामुळे दूरसंचार (संदेशवहन) क्षेत्रात भारताचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे.

**(3)** (१) ब्राझीलमधील वन्य जीवन अतिशय समृद्ध आहे. जगातील इतर कोणत्याही देशापेक्षा ब्राझीलमध्ये वन्य जीवनाची विविधता अधिक आढळते.

(२) ब्राझीलमधील पँटनाल या दलदलीच्या प्रदेशात महाकाय ॲनाकोंडा आढळतात.


(३) ब्राझीलमध्ये मोठे गिनीपिग व मगरी, सुसरी, माकडे, प्युमा, बिबट्या इत्यादी प्राणी आढळतात.

(४) माशांच्या प्रजातींमध्ये समुद्रातील स्वार्ड फिश तसेच नदीतील पिऱ्हाना व गुलाबी डॉल्फिन हे मासे येथील वैशिष्ट्ये आहेत.

(५) कोंडोर हा खूप उंचावर उडणारा मोठ्या आकाराचा पक्षी, विविध प्रकारचे पोपट, मकाऊ, फ्लेमिंगो या पक्ष्यांच्या प्रजाती आढळतात.

(६) लक्षावधी प्रकारचे कीटक हेसुद्धा ब्राझील देशातील वन्य जीवनाचे वैशिष्ट्य आहे.

**प्र. 4. (अ)**




**प्र. 4. (आ)**

(1) नकाशात चार विभाग केलेले दिसत आहेत.

(2) नकाशातील विभाग ब्राझीलमधील प्रमाणवेळांचे आहेत.

(3) सर्वसाधारणपणे ०° रेखावृत्ताच्या अनुषंगाने जागतिक प्रमाणवेळ निश्चित केली जाते. या रेखावृत्ताच्या पश्चिमेकडे असणाऱ्या देशांची वेळ 'जागतिक प्रमाणवेळेच्या मागे' असते.

(4) ब्राझीलमधील अतिपूर्व भागातील वेळ ही इतर विभागांपेक्षा पुढे आहे.

(5) काळ्या रंगाची ठळक रेषा ब्राझीलची अधिकृत प्रमाणवेळ दर्शवते.

**प्र. 5.**

**(1)** (१) क्षेत्रभेटीदरम्यान माहितीची नोंद करण्यासाठी नोंदवही, पेन, पेन्सिल इत्यादी साहित्याची गरज असते.

(२) क्षेत्रातील पाण्याचे, मातीचे, वनस्पतीचे नमुने गोळा करण्यासाठी कागदी पिशव्या किंवा बंद झाकणांचे डबे बरोबर नेणे आवश्यक असते.

(३) क्षेत्रभेटीच्या हेतूनुसार माहिती संकलनासाठी प्रश्नावली आवश्यक असते. म्हणून क्षेत्रभेटीसाठी उपयुक्त साहित्य व प्रश्नावली बरोबर घ्यावी लागते.

**(2)** (१) सर्वसाधारणपणे शीत कटिबंधातील देशांत ध्रुवीय वाऱ्यांमुळे नियमित बर्फवृष्टी होते. त्याचप्रमाणे एखाद्या देशातील समुद्रसपाटीपासून अतिउंच असणाऱ्या पर्वतीय अतिथंड प्रदेशात हिमवर्षाव होतो.

(२) ब्राझील या देशाचे स्थान शीत कटिबंधात नसून, ते उष्ण कटिबंधात आहे.

(३) याशिवाय ब्राझील देशात अतिउंच पर्वतीय प्रदेश नाहीत. त्यामुळे ब्राझीलमध्ये नियमित हिमवर्षाव होत नाही.

**(3)** (१) कृमी व कीटक हे प्रामुख्याने घनदाट वनांत, गवताळ प्रदेशात तसेच दलदलीच्या प्रदेशात आढळतात.

(२) झाडांची पाने, गवत, फुलांमधील रस इत्यादी कृमी व कीटकांचे खाद्य असते.


(३) ब्राझील देशात उत्तर भागात घनदाट वर्षावने, पॅराग्वे-पॅराना नद्यांच्या खोऱ्यांच्या प्रदेशांत गवताळ प्रदेश आणि पँटनाल येथे दलदलीचे प्रदेश आढळतात. त्यामुळे ब्राझीलमध्ये कृमी-कीटकांची संख्या जास्त आहे.

**(4)** (१) सुरुवातीच्या काळात युरोपमधील अनेक वसाहतवाद्यांनी ब्राझीलमध्ये लोकवस्त्या निर्माण केल्या. या वस्त्या प्रामुख्याने पूर्व किनारपट्टीच्या प्रदेशात निर्माण केल्या गेल्या.

(२) ब्राझीलमधील पूर्व किनारपट्टीच्या तुलनेने कमी रुंद पट्ट्यात सम व दमट हवामान, सुपीक जमीन, मुबलक पाणीपुरवठा व साधनसंपत्तीचा मोठ्या प्रमाणावरील साठा आढळतो.

(३) परिणामी, ब्राझीलच्या पूर्व किनारपट्टीच्या प्रदेशात शेती व इतर उद्योगांचा विकास झाला आहे. म्हणून या भागात लोकवस्त्याही विकसित झालेल्या आढळतात. त्यामुळे ब्राझीलमध्ये लोकवस्तीचे केंद्रीकरण पूर्व किनाऱ्यालगत आढळते.

**प्र. 6. (अ)**




(1) भारत देशाचा स्थूल अंतर्देशीय व्यापारातील हिस्सा जास्त आहे.

(2) २०१६ मध्ये भारताच्या स्थूल अंतर्देशीय उत्पादनात व्यापाराचा ४०% हिस्सा होता.

(3) १९८० मध्ये ब्राझीलच्या स्थूल अंतर्देशीय उत्पादनात व्यापाराचा हिस्सा २०% आहे.

**प्र. 6. (आ)**

(1) वरील दोन्ही आलेख भारत व ब्राझील या देशांतील लिंग गुणोत्तर दर्शवतात.

(2) भारतात पुरुषांची संख्या जास्त आहे.

(3) ब्राझीलमध्ये दरहजारी स्त्रियांची संख्या जास्त आहे.

(4) २००१ नंतर ब्राझीलमधील स्त्रियांची संख्या झपाट्याने वाढली आहे.

(5) १९६१ ला भारतातील दरहजारी स्त्रियांची संख्या ९४० होती.

(6) ब्राझीलमध्ये दरहजारी स्त्रियांची संख्या १००० पेक्षा जास्त आहे.

**प्र. 7.**

**(1)** ब्राझीलच्या उच्चभूमीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :

(१) ब्राझील देशातील दक्षिणेकडील भाग विस्तीर्ण पठाराने व्यापलेला आहे. हा भाग ब्राझीलचे पठार, ब्राझीलची उच्चभूमी किंवा ब्राझीलचे ढालक्षेत्र अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखला जातो.

(२) ब्राझील उच्चभूमीची दक्षिणेकडील व पूर्वेकडील भागांतील उंची तुलनेने अधिक आहे आणि ती १००० मीटरपेक्षा जास्त आहे. इतर भागातील उंची ५०० मीटर ते १००० मीटर दरम्यान आहे.

(३) ब्राझील उच्चभूमीची उंची उत्तरेकडे टप्प्याटप्प्याने कमी होत जाते. ब्राझील उच्चभूमीचे उत्तरेकडील उतार फारसे तीव्र नाहीत.

(४) ब्राझील उच्चभूमीच्या उत्तरेकडील उतारावरून ॲमेझॉन नदीच्या उपनद्यांचा उगम होतो.

(५) यांतील काही उपनद्यांमध्ये धावत्या व धबधबे दिसून येतात. या नद्या पुढे अटलांटिक महासागरास मिळतात.

(६) ब्राझील उच्चभूमीच्या दक्षिण उतारावरून पॅराग्वे, पॅराना, उरुग्वे इत्यादी नद्या उगम पावतात आणि पुढे त्या अर्जेंटिना देशाकडे वाहतात.

(७) ब्राझील उच्चभूमीचा पूर्वेकडील उतार अतिशय तीव्र असून तो अजस्र कडा म्हणून ओळखला जातो.

(८) ब्राझील उच्चभूमी (ढालक्षेत्र) व गियाना उच्चभूमी (ढालक्षेत्र) एकत्रितरीत्या दक्षिण अमेरिका खंडातील गाभाक्षेत्रे मानली जातात.

**(2)** भारतामध्ये नद्यांचे प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी पुढील उपाययोजना केल्या जात आहेत :

(१) विनाप्रक्रिया सांडपाण्याच्या विसर्गावर बंदी घालणे.

(२) कारखान्यांचे दूषित पाणी प्रक्रिया करून शुद्ध करून नदीत सोडणे.

(३) नदीकिनारी पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांकडून नद्यांचे प्रदूषण होऊ नये यासाठी मार्गदर्शक सूचना देणारे फलक उभारणे.

(४) नदीच्या पाण्यातील घाण व कचरा काढून नद्यांचे पात्र स्वच्छ करणे इत्यादी.

**(3)** (१) ब्राझीलमध्ये दक्षिण व आग्नेय भागांत, विविध औद्योगिक प्रदेशांत व 'सावो पावलो' या नव्याने विकसित झालेल्या महानगरात नागरीकरणाचे प्रमाण सर्वाधिक आहे.

(२) देशातील पश्चिमेकडील भागांत व इतर भागांत नागरीकरणाचे प्रमाण तुलनेने कमी आहे.

(३) देशातील विशिष्ट भागांत होणारी लोकसंख्येची वाढ व लोकवस्त्यांचे केंद्रीकरण टाळण्यासाठी ब्राझील सरकारने 'पश्चिमेकडे चला' या धोरणाला प्रोत्साहन दिले आहे.

(४) या धोरणामुळे ब्राझीलमधील केवळ विशिष्ट भागांत होणाऱ्या नागरीकरणाचे प्रमाण कमी होईल. परिणामी, लोकसंख्येचे विकेंद्रीकरण होऊन देशातील लोकसंख्येच्या वितरणातील असमतोल कमी होईल.